## परिपत्रक क्रमांक १४६/२०२०

## (अत्यंत महत्वाचे)

**संदर्भ:-** १) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील पत्र जा.क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ६०/२०/तांशि-१, दि. १९ मार्च, २०२०.

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. समय/२०२०/प्र.क्र.३५/१८ (र. व. का.) दि. १८ मार्च, २०२०.

३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक १४५/२०२० (जा. क्र. कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/१५८/२०२०, दि. १९.०३.२०२०.

४) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020.

५) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र जा.क्र. F.No. 1-14/2020(Website), dtd. 21.03.2020.

६) डॉ. मोहन खताळ, सहसंचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र जा.क्र.उशिसं/कोरोना/मवि-१/२०२०/३८१९/४०४२, दि. २३.०३.२०२०.

उपरोक्त संदर्भांकित शासकीय परिपत्रकांच्या अनुषंगाने शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत अधिसूचना निर्गमित केलेली आहे. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या दि. १८.०३.२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदी राज्यातील अकृषि विद्यापीठे व त्यांच्या अधिनस्थ शैक्षणिक संस्थांना संदर्भांकित क्र. ०१ मध्ये नमूद शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पत्राद्वारे लागू करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने कोरोना विषाणूंचा प्रसार राज्यातील विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांमध्ये होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय करण्याच्या संदर्भात सर्व संबंधितांना विद्यापीठ परिपत्रक क्रमांक १४५/२०२०, दि. १९.०३.२०२० अन्वये आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय (उच्चतर शिक्षा विभाग, उच्च शिक्षण विभाग), भारत सरकार, नवी दिल्ली यांचे उपरोक्त संदर्भ क्र. ४, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे संदर्भीय पत्र क्र. ५ व शिक्षण संचालनालयाचे संदर्भीय पत्र क्र. ६ अन्वये प्राप्त निर्देशानुसार कोरोना विषाणूचे देशाभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी व देशभरातील शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक/संशोधक /अधिकारी/ शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सुरक्षितेसाठी विविध उपाययोजना अंकित केल्या आहेत.

उपरोक्त संदर्भाधिन पत्र क्र. ४, ५ व ६ च्या अनुषंगाने **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभाग/विद्यापीठ परिसर/विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग** यांना सुचित करण्यात येते की, दि. २३ मार्च, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२० चे दरम्यान शिक्षक/संशोधक/अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपले घरी राहून (Work from Home) संबंधित विभागाचे कामकाज करावे. तद्वतच शिक्षक व संशोधकांनी हा काळ खालील शैक्षणिक बाबींसाठी उपयोगात आणावा.

- Online Content विकसीत करणे, ऑनलाईन अध्यापन व ऑनलाईन मूल्यमापन.
- पुढील सत्र/शैक्षणिक वर्षाकरीता शैक्षणिक साहित्य तयार करणे, अभ्यासक्रम तयार करणे.
- संशोधन करणे, लेख, संशोधन पेपर व संशोधनासंदर्भात इतर आवश्यक कार्यवाही करणे.

...२...

- नाविण्यपूर्ण प्रश्न संचयनी (Question Bank) तयार करणे.
- एक भारत श्रेष्ठ भारत व इतर महत्वाच्या विषयांवर नाविण्यपूर्ण प्रकल्प तयार करण्यासंदर्भात कार्यवाही करणे, इत्यादी.

उपरोक्त कालावधी हा शिक्षक (तदर्थ व कंत्राटी शिक्षक देखील) संशोधक/अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा कर्तव्य कालावधी (On Duty) म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

विद्यापीठातील वसतिगृहात अद्यापही वास्तव्याला असलेल्या विद्यार्थ्यांना विशेषत्वाने विदेशी विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्येच वास्तव्य करण्याची अनुमती देण्यात यावी व कोरोना विषाणूच्या संक्रमणापासून सुरक्षित राहण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाय संदर्भात आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याबाबत त्यांना सल्ला देण्यात यावा.

उपरोक्त बाबी लक्षात घेता, **विद्यापीठाच्या परिसरात कोणत्याही कारणास्तव जमाव/मेळाव्याच्या स्वरूपात जनसमुदाय एकत्रित येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्या अनुषंगाने कोणतेही कार्यक्रम उदा. चर्चासत्रे, परिसंवाद, सांस्कृतिक, जनजागृती कार्यक्रम, विविध बैठका, उजळणी वर्ग इ. कार्यक्रमांचे आयोजन पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत करु नये. (या संदर्भात मा. कुलगुरू महोदय यांची पूर्वपरवानगी घेतलेली असली तरी वरील बाबीचे गांभिर्य लक्षात घेऊन नियोजित सर्व कार्यक्रम रद्द करण्यात यावेत).**

आपत्कालीन परिस्थीतीमध्ये संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, संशोधक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वतःचे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी व संपर्क पत्ता संबंधित विभागप्रमुखांकडे सादर करावा. अत्यावश्यक सेवा **(पाणीपुरवठा, सामान्य प्रशासन [वाहनचालक, साफसफाई सेवा, सुरक्षा, मजुर व कामगार पुरवठा ह्या दृष्टीने], विद्युत व आरोग्य केंद्र इ.)** पुरविणाऱ्या प्रशासकीय विभागप्रमुखांनी या बाबत त्यांच्या स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

**सदरचे निर्देश हे दि. ३१.०३.२०२० पर्यंत लागू राहतील.**

जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/१६०/२०२०
दि. २३.०३.२०२०

(प्रा. भा. व्यं. पवार)
**प्र. कुलसचिव**

प्रति,

१. विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/विभागांचे प्रमुख,
२. सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी, कबचौउमवि., जळगाव.
३. मानद संचालक, प्रस्तुत विद्यापीठाचे प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर.
४. कार्यकारी संचालक, प्रस्तुत विद्यापीठाचे महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे.
५. नियंत्रक अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठाचे एकलव्य प्रशिक्षण केंद्र, नंदुरबार.
६. मा.रेक्टर/वसतिगृह अधिक्षीका/सहायक वसतिगृह अधिक्षक, मुलांचे व मुलींचे वसतिगृह, कबचौउमवि., जळगाव.

**प्रत माहितीसाठी.**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
३. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
५. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.